**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय**
**पिंपरी १८**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये हंगामी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपाची पदे दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत. .**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालयांकरिता दरमहा एकत्रित मानधनावर खाली तक्त्यात नमूद केलेली पदे व वेळोवेळी रिक्त होणारी पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता नेमावयाची आहेत. सद्यस्थितीत रिक्त असलेल्या पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अटी खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदनाम | रुग्णालय व पदसंख्या | पद संख्या | शैक्षणिक अर्हता /अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ | थेरगाव रुग्णालय, थेरगाव<br>यमुनानगर रुग्णालय,यमुनानगर<br>जिजामाता रुग्णालय, पिंपरी | १<br>१<br>१ | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील एम.बी.बी एस., एम.डी. भुल शास्त्र अथवा डिप्लोमा भुल शास्त्र, कामाचा अनुभव असणे आवश्यक |
| २ | बालरोग तज्ञ | तालेरा रुग्णालय, चिंचवड | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस.,एम.डी. बालरोग/डीसीएच कामाचा अनुभव असणे आवश्यक |
| ३ | भिषक (फिजिशियन) | यमुनानगर रुग्णालय, यमुनानगर<br>तालेरा रुग्णालय, िचंचवड | १<br>१ | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील एम.बी.बी एस., एम.डी. मेडीसीन, कामाचा अनुभव असणे आवश्यक |
| ४ | रेडिओलॉजिस्ट (क्ष किरण शास्त्रज्ञ) | तालेरा रुग्णालय, चिंचवड | १ | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील एम.बी.बी एस., एम.डी. क्ष किरण शास्त्र अथवा डिप्लोमा क्ष किरण शास्त्र, कामाचा अनुभव असणे आवश्यक |
| ५ | वैद्यकीय अधिकारी-(एमबीबीएस) | तालेरा रुग्णालय, चिंचवडगांव<br>जिजामाता रुग्णालय, पिंपरी<br>भोसरी रुग्णालय, भोसरी<br>थेरगाव रुग्णालय, थेरगाव<br>सांगवी रुग्णालय,सांगवी | ४<br>२<br>४<br>१<br>१ | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील एम.बी.बी एस उत्तीर्ण |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (तातडीक सेवा) | तालेरा रुग्णालय, चिंचवडगांव<br>आकुर्डी रुग्णालय, आकुर्डी<br>जिजामाता रुग्णालय, पिंपरी<br>भोसरी रुग्णालय, भोसरी | १<br>२<br>3<br>3 | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील एम.बी.बी.एस. उत्तीर्ण |
| ७ | निवासी वैद्यकीय अधिकारी | जिजामाता रुग्णालय, पिंपरी<br>थेरगाव रुग्णालय, थेरगाव<br>वाल्हेकरवाडी दवाखाना, वाल्हेकरवाडी<br>सांगवी रुग्णालय, सांगवी<br>भोसरी रुग्णालय, भोसरी<br>तालेरा रुग्णालय, चिंचवडगांव | २<br>२<br>१<br>१<br>१<br>१ | मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील बी.ए.एम.एस./एम.बी.बी.एस उत्तीर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस./एम.बी.बी.एस.) | चिखली म्हेत्रे वस्ती दवाखाना<br>किवळे दवाखाना, किवळे<br>पुनावळे दवाखाना, पुनावळे<br>खराळवाडी दवाखाना, खराळवाडी<br>मोशी दवाखाना, मोशी<br>च-होली दवाखाना, च-होली<br>पिंपळे गुरव दवाखाना, पिंपळे गुरव | १<br>१<br>१<br>१<br>१<br>१<br>१ | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील बी.ए.एम.एस./ एम.बी.बी.एस. उत्तीर्ण |

**दरमहा एकत्रित मानधन खालीलप्रमाणे -**

| अनुभव | बी.ए.एम.एस. | निवासी वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस.व तातडीक सेवा | तज्ञ वैद्यकीय अधिकारी | | रेडिओलॉजिस्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एम.बी.बी.एस. व पदविका | एम.बी.बी.एस. व पदवी | |
| ३ वर्षापेक्षा कमी | र.रु.१५०००/- | र.रु.१५०००/- | र.रु.२५०००/- | र.रु.३५०००/- | र.रु.५००००/- | र.रु.५००००/- |
| ३ ते ५ वर्ष | र.रु.१७०००/- | र.रु.१७०००/- | र.रु.३००००/- | र.रु.४००००/- | र.रु.५५०००/- | र.रु.५५०००/- |
| ५ वर्षापेक्षा जास्त | र.रु.२००००/- | र.रु.२००००/- | र.रु.३५०००/- | र.रु.४५०००/- | र.रु.६००००/- | र.रु.६००००/- |

**टिप-**

1. मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.
2. ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.
3. मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.
4. उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल.
5. सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा- गुणपत्रिका(मार्कशीट), सर्टीफीकेट, इतर सादर करणे बंधनकारक आहे.
6. निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल.
7. सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागु राहील.
8. आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झालेस सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नेमणुक करणेत येईल.

**मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-**

- जनरल डयुटी वैद्यकिय अधिकारी पदावरील उमेदवारांना रोज किमान आठ तास डयुटी करावी लागेल. तसेच आठवडयातुन दोन दिवस ऑन कॉल डयुटी करावी लागेल.
- तज्ञ डॉक्टरांना दररोज स. 9-2 या वेळेत ओ.पी.डी व रुग्णालयाचे कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच दररोज इमरजन्सी ऑनकॉल डयुटी करावी लागेल.
- मनपा रुग्णालयाचे परिसरात वास्तव्य करणा-या तज्ञ वैद्यकिय अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवारांना रुग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील.
- उमेदवारांना मुलाखतीच्या वेळेस जाहीरातीसोबत असलेल्या फॉर्ममध्ये कामकाजाच्या रुग्णालयाच्या पसंतीक्रम द्यावा लागेल. पसंतीनुसार रुग्णालयात नेमणुक देणेचा अधिकार मा. आयुक्तांचा राहील.
- उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी दर सोमवारी दुपारी 3.00 वाजता मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- 411 018 यांचे कक्षात मुलाखती करिता (Walk In Interview) अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतींसह समक्ष उपस्थित रहावे.

ता.क. 1.मुलाखतीच्या वेळी भरावयाच्या अर्जाची प्रत निम्नलिखित वेबसाईटवर उपलब्ध आहे.

2. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी मुलाखतीच्या १ तास अगोदर वैद्यकीय विभागात (दुसरा मजला), पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन येथे हजर रहावे.

मुलाखतीचे स्थळ-

मा.आयुक्त कक्ष,
पिं.चिं.म.न.पा., पिंपरी – 411 018.

जाहिरात क्रमांक -
वेबसाईट – **www.pcmcindia.gov.in**
वैद्य/१अ/कावि/906/2013
दि. 05/09/2013

**सही/-**

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 411 018

## <u>उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना</u>

**प्रति,**

**मा. आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी-** 411 018

**विषय :मानधनावरील ------------------------------------ या पदासाठी अर्ज.**

**महोदय**,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी ----------------------------------- हंगामी पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर **---------------------------------------** या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

**आडनाव** **स्वत:चे नाव** **वडील/पतीचे**

1) संपूर्ण नाव :-------------------------------------------------------------------

2) पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------

-----------------------------------------मोबाईल क्र.-------------

3) जन्मतारीख :-

4) लिंग :- पुरुष ☐ स्त्री ☐

5) महाराष्ट्र मेडिकल/इंडियन मेडिकल कौन्सिल कडिल नोंदणी क्रमांक------------------------- दिनांक :---------

नुतनीकरण कालावधी---------------------------पर्यंत

6) जात - प्रवर्ग -

7) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-

| **अ.क्र** | **शैक्षणिक अर्हता** | **संस्था विद्यापीठ** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले एकुण गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

8) तांत्रिक व इतर अर्हता तपशिल :-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

9)अनुभवाचा तपशिल :-

| **अ.क्र** | **संस्थेचे नाव** | **संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह** | **पद** | **कालावधी** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10)उमेदवाराचा बँक खाते तपशिल: अ) बँकेचे नाव व शाखा---------------------------------

ब) बँक खाते क्रमांक-----------------------------------

क) खात्याचा प्रकार-----------------------------------

11)कामकाजासाठी रुग्णालयाचा पसंतीक्रम- 1.-------------------------------

2. ------------------------------

3. ------------------------------

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणीत करतो /करते की,वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरून कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ :-**

**अर्जदाराची सही**

**दिनांक :-**

**सहपत्रे** :- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे

1. शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्र.
2. अनुभवाचे प्रमाणपत्र.
3. महाराष्ट्र मेडिकल/इंडियन मेडिकल कौन्सिल कडिल नोंदणी प्रमाणपत्र
4. जात प्रमाणपत्र
5. आधार नोंदणी कार्ड झेरॉक्स/ पोहोच पावती